# ३५ योनिदाह : आयुर्वेदिक निदान व उपचार

(स्त्री–जनन संस्थेचे काही आजार )

| प्रकार व निदान | योनिस्थानी उपचार | पोटातून देण्याची औषधे |
|---|---|---|
| **१. वातज योनिदाह (योनिभागी कोरडेपणा, लघवीस वेदना, कंबर दुखणे इ.** | त्रिफळा काढ्याने योनिधावन व स्नेहपिचू | दशमूल काढा (यात तेल किंवा तूप टाकून घ्यावे) किंवा वेखंड+हळद+ आवळकाडी पूड (प्रत्येकी अर्धा चमचा) कोमट पाण्याबरोबर द्यावी. लघवीस जळजळ होत असल्यास चंदनचूर व ताळा यांचा काढा. चंदन उगाळून पाण्यातून पिण्यास द्यावे. |
| **२. पित्तज योनिदाह (योनिभागी लालसरपणा, सूज, स्त्राव, लैंगिक संबंधात दुखणे, मूत्रमार्गात आग, इ.)** | अनंतमूळाच्या कोमट काढ्याने योनिधावन व स्नेहपिचू | अनंतमूळ, ज्येष्ठमध, चंदन यांचा काढा (एकत्रित) **किंवा** दुर्वांचा रस (१ चमचा)+ कडूनिंबाचा रस (१ चमचा)+तूप (१ चमचा) याबरोबर पांढरे चंदन उगाळून १ चमचा पाण्याबरोबर प्यायला द्यावे. |
| **३. कफज योनिदाह (योनिमार्गात खाज, पांढरा चिकट स्त्राव, सूज इ.)** | वेखंड +हळद काढ्याने योनिधावन व स्नेहपिचू | चंदन उगाळून १ चमचा पाण्याबरोबर पिण्यास द्यावे. चंदन मिळणे शक्य नसल्यास कडुनिंबाचे खोड उगाळून पाण्यातून पिण्यास द्यावे. (यामुळे जंतुदोष, खाज,सूज कमी होते.) **किंवा** पुष्यानुग चूर्ण १ चमचा पाण्याबरोबर द्यावे. |
| दशमूल म्हणजे बेल, शिवणमूळ, ऐन, पाडळमूळ, टेंटुमूळ, सालवण, पिठवण, रिंगणी, डोरली, गोखरू यांची मुळे.<br>काढा करण्यासाठी या सर्वांचे समभाग प्रमाण घेऊन त्याची एकूण दोन चमचे भरड पावडर दोन कप पाण्यात घालून ते अर्धा कप होईपर्यंत उकळावे व ते पिण्यास द्यावे. | | |